वि.दि.दावा क्र. १५४/२०२३
मंदाबाई ठाकरे वि. रामराव
निशाणी क्र.१००

वादीतर्फे साक्षीदार क्र.१ सुर्यभान शामराव महल्ले,

**साक्षीदाराचा पुढील उलटतपास प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. पालीवाल उलटतपास –**

माझे शिक्षण तीसरी पर्यंत आहे. सध्या मी काहीही कामधंदा करत नाही. साक्षीसमन्स मला आले नव्हते. मी आज रोजी रंगरावच्या सोबत आलो आहे. वादी, प्रतिवादी मला समजत नाही. हे म्हणणे खरे नाही की शपथपत्र आगोदरच वकीलांनी बनवुन ठेवल होत. हे म्हणणे खरे नाही की शपथपत्र न वाचताच मी सही केली. वादमिळकतीचा सातबारा उतारा मी पाहिला नाही. हे म्हणणे खरे आहे की मी वडीलोपार्जित म्हणत आहे कारण ती माझ्या जन्मापासुन रामरावच्या ताब्यात होती. रामराव आपल्या मलगा आणि मुलींना समान वागणुक देत होते. मंदाबाईचे लग्न मी पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की लग्नामधील दागदागिणे रामराव याने करुन दिले होते. रामराव यांनी मंदाबाईचे लग्न करुन दिले तिला दागिणे आणि नगदीच्या स्वरुपात हक्क दिल आणि रामराव याने ते सर्व स्वतःच्या मनाणे दिल. हे म्हणणे खरे आहे की रामराव हे मोहन आणि मोहनच्या मुलांजवळ राहत होते. हे म्हणणे खरे आहे की मोहनच रामरावची देखभाल करत होते.

प्रश्न– रामराव याने त्याच्या हयातीमध्ये मोहन आणि त्यांच्या मुलाच्या नावाने बक्षिस पत्र करुन दिले

उत्तर बक्षिसपत्राबददल मला माहिती आहे परंतु त्यावर माझा विश्वास नाही.

शेत सर्वे नं. ३७/२ ही शेतजमिन हया केवलराम याने कधी विकत घेतली त्याचे वर्ष मला माहित नाही. मला शेताचा नंबर कळत नाही. हे मला वाटत नाही की शेती ही रामरावने, केवलरामच्या नावाने विकत घेतली होती. केवलराम कोणत्या वर्षी नोकरीला लागला हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की वादीच्या सांगण्यावरुन मी शेतजमिन वडीलोपार्जित असल्याचे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी वादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

I.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2025.07.25 11:26:38 +0530

दिनांक २४.०७.२०२५ (एस.एम. सरोदे)

रामटेक दिवाणी न्यायाधीश व. स्तर,

रामटेक

## **CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. khobragade (Gr.–II)